// सा विद्या या विमुक्तये //
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णूपुरी, नांदेड–४३१ ६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
"Dnyanteeerth", Vishnupuri, Nanded – 431606 (Maharashtra)
Establishment on 17th September 1994 -Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' Grade

## ACADEMIC (AFFILIATION) SECTION

Phone : (02462) 215242 (Ext. 152)
Fax : (02462)215572
Website : srtmun.ac.in
e-mail : affiliation@srtmun.ac.in

अशासकीय महाविद्यालयांच्या नॅक मूल्यांकन / पुनर्मूल्यांकन व मानांकनाबाबत.

:: परिपत्रक ::

संदर्भ :– १. मा. डॉ. शैलेंद्र देवळाणकर, प्र.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे–१ यांचे पत्र क्र. एनजीसी/२०२३/नॅक/अशा.अनु.म.वि./औवि/मवि–३/३१७७, दि. ०२.०३.२०२३.
२. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१०/(२०/१०)/विशि–३, दि. ०८.१०.२०१०

प्रस्तूत विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायमविना अनुदानित महाविद्यालये/संस्था यांचे अध्यक्ष/सचिव व प्राचार्य यांना कळविण्यात येते की, संदर्भ क्र. ०२ मधील शासन निर्णयानुसार अकृषि विद्यापीठे व संलग्नीत महाविद्यालयांचे मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन अनिवार्य करण्यात आलेले आहे. यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेमध्ये अपेक्षित वाढ होउन उच्च शिक्षणाचा दर्जा वाढण्यास मदत होते.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ मधील पोटकलम ६(ख) मध्ये महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाची तरतूद नमूद केली आहे. तसेच मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर येथील याचिका क्र. ५२८०/२०१५ मधील दि. १६.११.२०१६ च्या निकालातही नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाचे महत्व अधोरेखित केले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाविद्यालयच्या पायाभूत सुविधामध्ये वाढ होणे व शैक्षणिक गुणात्मक दर्जा वाढीसाठी नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करुन घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त वेळोवेळी निर्देश देवूनही महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करुन घेतलेले नाही ही बाब शैक्षणिकदृष्टया योग्य नाही. यास्तव सर्व महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रक्रिया तात्काळ सुरु करुन दि. ३१ मार्च २०२३ पर्यंत नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रारंभ टप्यातील संस्था नोंदणी (HE Registration) करुन IIQA (Institutional Information for Quality Assessemt) नॅक कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे. सदरील

दिनांकापर्यंत IIQA सादर न केल्यास शैक्षणिक वर्ष २०२३–२४ करिता प्रथम वर्षाच्या प्रवेशास निर्बंध लागू करणेबाबत शासनास प्रस्तावित करण्यात येईल.

तरी, आपण खालील दिलेल्या तक्यात माहिती सादर करण्यात यावी व त्याची एक प्रत या विभागास अवगत करण्यात यावी.

**तक्ता**

| विभाग | महाविद्यालयाचे नांव | नॅक मूल्यांकन प्रक्रियेत सहभाग घेतला आहे/नाही. नसल्यास संक्षिप्त कारण नमूद करावे | असल्यास प्रक्रियेची सद्यस्थिती जसे(LOI/IIQA Submission /Peer TeamVisit etc.) | मूल्यांकन झाले असल्यास नॅक ग्रेड व CGPA | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

सदर परिपत्रक हे विद्यापीठाच्या www.srtmu.ac.in या संकेतस्थळावर affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करण्यात येत आहे.

''ज्ञानतीर्थ'', परिसर,
विष्णूपुरी, नांदेड–४३१ ६०६
जा.क्र.शैक्षणिक/संलग्न–०३/२०२२–२०२३/1467
दिनांक :– १०.०३.२०२३

उपकुलसचिव
शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :–

१. मा. अध्यक्ष, सचिव व मा. प्राचार्य,सर्व अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायमविना अनुदानित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२. सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळवार Affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करावे.

प्रत :–

१. मा. डॉ. शैलेंद्र देवळाणकर, प्र.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे–४११००१.